रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तितुल्या सदा //

**'विधी'-लिखित**

कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका

१

# महिलांविषयक कौटुंबिक कायदे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई
समान हक्क
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

सदस्य



**नीता राजेंद्र ठाकरे**

सदस्य



**गयाताई शिवाजीराव कराड**

सदस्य



**देवयानी ठाकरे**

सदस्य



**विंदा कीर्तीकर**

सदस्य



**ॲड. आशा लांडगे**

पदसिद्ध सदस्य



**सतीश माथूर**
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



**डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे**

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# ‘सुहिता’

## तुमच्यासाठी आयोगाचा
## मदतीचा हात

संकटात आहात?
माहिती हवीय?

Helpline

# ७४७७७२२४२४

## घाबरू नका..
## सहन करू नका...

## संपर्क साधा ‘सुहिता’वर

## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची हेल्पलाइन

आयोगाशी संपर्क

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

'विधी'-लिखित
कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका
१

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
म्हाडा भवन, कलानगर,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दूरध्वनी (०२२) - २६५९०७३९

**मुखपृष्ठ, मांडणी**
साहिल पब्लिकेशन
वंदन पाटील
आनंदनगर, सिंहगड रोड.
९९२२९१३५८०, ९०११०८७४२९

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परेल, मुंबई–१३

**प्रथम आवृत्ती**
मे २०१८

**किंमत**
**संपूर्ण पुस्तक संच : १०० रूपये**
**प्रति पुस्तक : १० रूपये**



---

**महत्वाची सूचना :**
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तिकेत सर्वसामान्यांना, विशेषतः महिलांना कायद्याची माहिती सुलभ भाषेत व्हावी, यासाठी हा मजकूर प्रकाशित करण्यात आला आहे. हा मजकूर म्हणजे मूळ कायद्याचा शब्दशः तर्जुमा नव्हे. कुठल्याही कायद्याचा अर्थ, अन्वयार्थ यासाठी मूळ इंग्रजी मसुदा व त्याचा अर्थच ग्राह्य धरला जाईल, याची वाचकांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**– प्रकाशक**

# भूमिका



**प्रिय मैत्रिणींनो,**

**सस्नेह नमस्कार,**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित **'विधी'लिखित** या मालिकेतील ही पहिली पुस्तिका आपल्या हातात देताना मला मनःपूर्वक आनंद होत आहे. आपल्या देशात महिलांच्या हितासाठी अनेक कायदे केले गेले आहेत. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून काही कायदे अस्तित्वात आहेत. काळानुरूप त्यात बदलही होत गेले आहेत. देश स्वतंत्र झाल्यानंतर आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाने लिहिलेली आदर्श अशी राज्यघटना उपलब्ध झाली. आपल्या संसदेने या घटनेच्या मूळ तत्त्वांचा आधार घेत, महिलांच्या कल्याणासाठी अनेक नवे कायदेही केले. वेळोवेळी त्यात सुधारणा करण्यात आल्या. या सर्व कायद्यांची माहिती महिलांना असावी, यासाठीच सुलभ मराठीत त्या आणण्याचा हा आयोगाचा प्रयत्न आहे.

देश स्वतंत्र होऊन सत्तर वर्षे उलटून गेली असली आणि आपण आज एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात असलो, तरी महिलांवरील अत्याचारांमध्ये, अन्यायामध्ये वाढच होताना दिसते आहे. आईच्या गर्भातच स्त्रीचा भ्रूण खुडण्यापासून या अन्यायाला सुरुवात होते. जन्माला आल्यापासून ते मृत्यूपर्यंत स्त्री वेगवेगळ्या टप्प्यांवर अनेक अत्याचार सहन करीत असते. जवळच्या आप्तांकडून होणाऱ्या बलात्कारासारख्या घृणास्पद कृत्यापासून ते कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापर्यंत तिला या अन्यायाला सतत तोंड द्यावे लागते. असमानतेची वागणूक, हुंड्यासाठी छळ, सासरी होणारी घुसमट, समाजात वावरताना स्त्री म्हणून सतत असुरक्षिततेची जाणीव, समाजाच्या योनीशुचितेच्या अवास्तव कल्पना आणि त्यातून उद्भवणारे वेगळेच अत्याचार अशा अनेक प्रकारांनी महिलांचा अनन्वित छळ होत असतो. काही ठिकाणी तर कल्पनेपलीकडे भयंकर अशा स्वरूपाचे हे अत्याचार होताना दिसतात. एक जबाबदार लोकशाही देश म्हणून स्त्रीला समानतेची, आदराची, सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यात कुचराई होत असेल, तर आपल्या न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्याची सोय आपल्याला उपलब्ध आहे. आपल्यासाठी कोणते कायदे आहेत आणि त्यांचा काय उपयोग आहे हे अनेकदा महिलांनाच माहिती नसते. या पुस्तिकांद्वारे किमान माहितीची ही उणीव दूर होईल, अशी आशा आहे.

शक्यतो कायद्यांचा उपयोग करायची वेळ कुणावर येऊ नये, ही इच्छा आहे. मात्र, वेळ पडलीच तर महिलांनी याही आघाडीवर आपण सक्षम आणि निर्भय आहोत, हे दाखवून द्यावे, हाच या पुस्तिकांच्या प्रकाशनामागचा हेतू आहे. या पहिल्या पुस्तिकेत **'महिलाविषयक कौटुंबिक कायदे'** यांचा परिचय करून देण्यात आला आहे. तो आपल्याला उपयुक्त वाटेल, अशी आशा करते.

**विजया रहाटकर,** अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई



# भारतीय स्त्रीचे सामाजिक स्थान

भारतात शतकानुशतके पुरुषप्रधान किंवा पितृसत्ताक पद्धतीचा अवलंब झालेला पाहायला मिळतो. एके काळी देवीचे स्थान देण्यात आलेल्या स्त्रीच्या सामाजिक दर्जाची कालानुरूप अधोगती होत गेली. याला वेगवेगळे घटक जबाबदार होते. आजही केरळसारख्या एखाद्या राज्याचा आणि ईशान्य भारतातील काही राज्यांचा अपवाद सोडला, तर भारतात सर्वत्र पुरुषप्रधान संस्कृतीचा मोठा प्रभाव पाहायला मिळतो. यामुळे स्त्रीभ्रूणहत्येपासून ते हुंडाबळीपर्यंत आणि लैंगिक अत्याचारापासून ते बाजारातील वस्तूप्रमाणे विक्री करण्यापर्यंत अनेक भोग भारतीय स्त्रीच्या वाट्याला वर्षानुवर्षे येत गेले आहेत. स्त्रीचे हे दमन सार्वत्रिक होते. त्यात कोणताही धर्म, जात, भाषा, वंश असा भेद नव्हता. एरवी प्रचंड विविधता आणि फरक असलेल्या या देशात स्त्रीला मिळणाऱ्या दुय्यम आणि हीन वागणुकीबाबत मात्र 'राष्ट्रीय एकात्मता' होती. महाराष्ट्रापुरते पाहिले, तर हे चित्र गेल्या दोन शतकांपूर्वीपर्यंत कायम होते. आपल्या महाराष्ट्रात सतराव्या शतकात, म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्त्रीचा अनेक वर्षांनी सन्मान झाला. महाराजांनी स्त्रीवर अत्याचार करणाऱ्या बड्या धेंडांचे हात-पाय कलम केले. स्त्रियांचा आदर करण्याची छत्रपतींची शिकवण होती. मात्र, महाराजांच्या नंतरच्या काळात काळानुरूप पुन्हा एकदा स्त्रीचा सामाजिक दर्जा घसरला. 'रांधा, वाढा आणि उष्टी काढा' एवढेच तिचे काम उरले. या काळातही अहल्यादेवी होळकर, झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई अशा काही कर्तृत्ववान स्त्रियांनी स्त्रीच्या सामर्थ्याचे दर्शन घडविलेही. मात्र, सर्वसामान्य स्त्रीची अवस्था फारशी चांगली नव्हती.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचे वारे वाहू लागले. महात्मा जोतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रीय स्त्रीचा खऱ्या अर्थाने उद्धार केला. पुण्यात १८४८ मध्ये स्त्रीला शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. त्यानंतर महर्षी कर्वे, गोपाळ गणेश आगरकर यांनीही स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. आज एकविसाव्या शतकातील स्त्री स्वतंत्र आणि स्वयंप्रज्ञ आहे, याचे श्रेय महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांच्या चळवळीला देण्यात येते.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीच्या सुरक्षेसाठी विविध कायदे करण्यात आले. यातल्या अनेक कायद्यांची किंवा तरतुदींची पुष्कळ महिलांना माहिती नसते. त्यामुळे त्यांचे आर्थिक, शारीरिक, मानसिक नुकसान होऊ शकते. ते टाळण्यासाठी किमान या प्रमुख कायद्यांची माहिती तरी त्यांना व्हायला हवी. त्यासाठी यातील काही प्रमुख कायद्यांची माहिती आपण घेऊ.

# बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६



एका आंतरराष्ट्रीय पाहणीनुसार, जगभरात तब्बल ४७ टक्के मुलींचे विवाह वयाच्या १८ वर्षांच्या आत होतात. भारतात मुलीच्या विवाहाचे वय १८ निश्चित करण्यात आले आहे, हे आपल्याला माहिती आहेच. मात्र, भारतात मोठ्या प्रमाणात बालविवाह केले जातात. याबाबत जगात भारताचा १३ वा क्रमांक लागतो. भारतीय पुरुषप्रधान संस्कृती आणि जुन्या रुढी-परंपरांचा पगडा यामुळे भारतात, विशेषतः ग्रामीण भागात आजही मुलगी वयात आली, की तिचे लग्न लावून दिले जाते. लहान वयात लग्न केल्यामुळे त्या मुलीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. भारतात मोठ्या प्रमाणावर मुलींचे बालविवाह केले जात असल्यामुळे ते रोखणे अवघड आहे. त्यासाठी २००६ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला. हा कायदा २००७ मध्ये अमलात आला. या कायद्यानुसार, मुलीचे वय १८ पूर्ण आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसेल, तर तो कायद्याने गुन्हा मानला गेला आहे. अशा विवाहास बालविवाह मानले जाते आणि तो बेकायदेशीर ठरतो. मुलीचे वय १८ पूर्ण आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसताना त्यांचा विवाह केल्यास त्यांचे कायदेशीर पालक शिक्षेला पात्र ठरतात.

भारतात बालविवाह प्रतिबंधक कायदा एक नोव्हेंबर २००७ रोजी अस्तित्वात आला. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर २००७ मध्ये एक ऐतिहासिक निवाडा दिला. त्यानुसार अल्पवयीन पत्नीशी शरीरसंबंध हा गुन्हा ठरविण्यात आला. तोपर्यंत पुरुषांना लग्नबंधनामुळे अल्पवयीन वधूशीही शरीरसंबंध ठेवता येणे हा गुन्हा नव्हता.

## कायद्याचे स्वरूप

या कायद्याचे २१ विभाग आहेत. जम्मू–काश्मीर वगळता आणि केंद्रशासित प्रदेश पाँडिचेरीतील फ्रेंच नागरिकत्व असलेले लोक वगळता तो सर्वत्र लागू आहे.

**दुसऱ्या विभागात काही व्याख्या दिल्या आहेत. त्या अशा :**

- बाल – २१ वर्षे पूर्ण न केलेला पुरुष व १८ वर्षे पूर्ण न केलेली स्त्री.
- विवाहेच्छू कुटुंब – लग्न ज्याचे किंवा जिचे आहे, त्याचे किंवा तिचे अशी दोन्ही कुटुंबे.
- बालविवाह – वर व वधू यापैकी कुणीही बाल असेल, तर तो बालविवाह.
- अल्पवयीन – सज्ञान कायद्यन्वये जो सज्ञान नाही, अशी कुठलीही व्यक्ती.

विवाहविच्छेद (कलम ३) – प्रत्येक बालविवाह विवाहेच्छू कुटुंबांच्या मर्जीने रद्द करता येतो. सज्ञान झाल्यानंतर दोन वर्षांच्या आत वर किंवा वधू जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करून विवाहविच्छेद करू शकतात. यासंबंधात जिल्हा न्यायाधीश संबंधित कुटुंबांना विवाहाचा खर्च, पैसे, दागिने, भेटवस्तू व इतर किमती वस्तू दुसऱ्या कुटुंबास परत देण्याचा आदेश देऊ शकतात.

पोटगी व निवास तरतूद – बालविवाह रद्द करताना जिल्हा न्यायाधीश वधू पक्षाला पोटगीरूपी भरपाई देण्याचा आदेश वर पक्षाला देऊ शकतात. बालविवाहातील पुरुषही अल्पवयीन असेल, तर त्याच्या पालकांना ही भरपाई द्यावी लागेल. वधूचा दुसरा विवाह होईपर्यंत तिला ही भरपाई घेता येते. ही भरपाई एकदा किंवा दरमहा देता येते. याचसोबत वधूच्या राहण्याची व्यवस्था करण्याबाबतचा आदेशही न्यायालय देऊ शकते. वधूची सांपत्तिक स्थिती बघून न्यायालय हा आदेश देऊ शकते.

## शिक्षेची तरतूद

१. **सज्ञान पुरुष :** बालविवाह करणारा पुरुष १८ वर्षांहून अधिक वयाचा असेल, तर त्याला दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते. किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

२. **लग्न लावल्याबद्दल शिक्षा :** बालविवाह लावणारा, ठरवणारा, पार पाडणारा, सूचना देणारा अशा कुठल्याही पद्धतीने या विवाहाला प्रोत्साहन देणारा माणूस शिक्षेस पात्र आहे. अशा व्यक्तीला दोन वर्षे सक्तमजुरीची किंवा एक लाख रुपये दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

३. **बालविवाहास प्रोत्साहन, परवानगी दिल्याबद्दल शिक्षा :** बालविवाहास परवानगी देणारे माता–पिता, अन्य पालक किंवा अशी एखादी संस्था, कळत–नकळतपणे या विवाहाला मान्यता देणारे, या विवाहास उपस्थित राहणारे अशा कुणालाही, दोषी आढळल्यास दोन वर्षे सक्तमजुरी किंवा एक लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.



# विशेष विवाह कायदा, १९५४

या कायद्याच्या नावाप्रमाणेच हा विशेष कायदा खासकरून, आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाहांना लागू होतो. भारतात कुठल्याही दोन सज्ञान (म्हणजेच मुलाच्या बाबतीत २१ वर्षे पूर्ण आणि मुलीच्या बाबतीत १८ वर्षे पूर्ण) व्यक्तींना परस्पर संमतीने विवाह करता येतो. अनेकदा दोन भिन्न धर्मांतील व्यक्ती किंवा दोन भिन्न जातींमधील, पंथांमधील, समुदायातील व्यक्ती लग्न करण्याचा निर्णय घेतात. त्यांना त्यांच्या विवाहाची नोंदणी 'विशेष विवाह कायद्या'अंतर्गत करावी लागते. भारतात हा कायदा एक जानेवारी १९५५ पासून अमलात आला.

हा कायदा लागू करताना तीन उद्दिष्टे ठेवण्यात आली होती.

अ) काही विशेष बाबींमध्ये विशेष लग्न म्हणून परवानगी देणे,

आ) काही विशेष विवाहांची नोंदणी करणे शक्य व्हावे,

इ) घटस्फोट देण्याची व्यवस्था असणे.

## पात्रता

१. कोणत्याही धर्माची व्यक्ती.

२. हिंदू, मुस्लिम, बुद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन, पारशी, ज्यू यापैकी कुणीही या कायद्यान्वये विवाह करू शकतो.

३. आंतरजातीय विवाहही या कायद्याअंतर्गत होऊ शकतो.

४. हा कायदा संपूर्ण भारतात (अपवाद जम्मू–काश्मीर) लागू होतो. दोघेही भारतीय नागरिक असतील, तर परदेशांत राहणाऱ्या भारतीयांनाही हा कायदा लागू होतो.

५. परदेशात राहणारा भारतीय नागरिक.

६. जिल्हा विवाह नोंदणी कार्यालयात तीस दिवसांची नोटीस देऊन हे लग्न नोंदणीकृत करता येते. दोन्हीपैकी एक बाजू किमान तीस दिवस त्या ठिकाणची रहिवासी असावी.

७. तीस दिवसांच्या नोटिशीनंतर विवाह नोंदणी कार्यालयात लग्न करता येते.

८. विवाह नोंदणी अधिकारी व तीन साक्षीदारांच्या उपस्थितीत दोन्ही बाजूंनी 'मी त्याचा/तिचा कायदेशीर पती/पत्नी म्हणून स्वीकार करीत आहे,' असे म्हणेपर्यंत हा विवाह दोन्ही बाजूंवर बंधनकारक नसेल.

## अटी

१. दोन्ही बाजूंपैकी कुणाचाही आधी विवाह झालेला असता कामा नये. दोन्ही बाजूंचा हा प्रथम विवाह असावा.

२. वराचे वय २१ वर्षे पूर्ण, तर वधूचे वय १८ वर्षे पूर्ण हवे.

३. विवाहास मान्यता देण्याइतपत मानसिकदृष्ट्या सक्षम असले पाहिजे.

४. अवैध नातेसंबंधांत लग्न होऊ शकणार नाही.

**संपत्तीचे वारस :** या कायद्यान्वये लग्न केलेल्या व्यक्तीच्या संपत्तीचा वारसा हक्क भारतीय वारसा हक्क कायद्याने प्रस्थापित होईल. विवाह केलेल्या दोन्ही बाजू हिंदू, बुद्ध, शीख किंवा जैन असतील, ततर त्यांना हिंदू वारसा कायदा लागू होईल.



# हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१

भारतीय विवाहसंस्थेला कर्करोगासारखी ग्रासणारी एक वाईट पद्धत म्हणजे हुंडा. लग्न करून सासरी येणाऱ्या मुलीकडून हुंडा घेण्याची वाईट प्रथा भारतात अनेक शतके सुरू आहे. हा हुंडा रोख पैसे, दागिने, जवाहिरे, स्थावर वा जंगम मालमत्ता, पशुधन अशा कुठल्याही स्वरूपात मागितला जातो. ठरलेला हुंडा न दिल्यास विवाहितेचा सासरी छळ केला जातो. तिला मारहाण केली जाते, पशुवत वागविले जाते, प्रसंगी तिला जाळून मारण्यात येते. अशा या क्रूर प्रथेचा नायनाट व्हावा म्हणून भारतात १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. स्त्रीचे पुरुषांवरील अवलंबित्व कमी व्हावे आणि तिला स्वतंत्रपणे, मानाने जगता यावे यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. या कायद्यान्वये मुलीकडे कुठल्याही स्वरूपात हुंडा मागणे हा गुन्हा ठरतो.

हा कायदा २० मे १९६१ रोजी भारतात अस्तित्वात आला. जम्मू–काश्मीर राज्य वगळता तो सर्व देशात लागू आहे.

## हुंडा या शब्दाची व्याख्या

लग्न करताना दोन्ही बाजूंपैकी कोणत्याही बाजूने दुसऱ्या बाजूला देऊ केलेले पैसे, संपत्ती किंवा अन्य कुठल्याही प्रकारची स्थावर व जंगम मालमत्ता.

अ) एका बाजूने दुसऱ्या बाजूस देऊ केलेली, किंवा

आ) वर व वधू या दोन्ही बाजूंपैकी एका बाजूच्या पालकांनी दुसऱ्या बाजूस देऊन केलेली किंवा आश्वासित केलेली, लग्न होण्याआधी दिलेली किंवा लग्न झाल्यावर देणार असलेली कुठलीही संपत्ती, रोख पैसे, मालमत्ता. (मुस्लिम शरिया कायद्यात येणारे 'मेहेर' अपवाद)

शिक्षेची तरतूद – हुंडा प्रकरणी दोषी ठरल्यास पाच वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. याशिवाय १५ हजार रुपये दंड आणि/किंवा हुंडा म्हणून दिलेली रक्कम यांपैकी जी जास्त असेल ती.

# भारतीय घटस्फोट कायदा, १८६९

विवाहप्रमाणेच विवाहविच्छेदाला भारतीय घटस्फोट कायदा मंजुरी देतो. काही कारणाने विवाहित दांपत्याला लग्न संपुष्टात आणायचे असेल, तर ते कायद्याने करता येते. परस्पर संमतीने घटस्फोट, विवाहविच्छेद, न्यायिक विभक्तता, आणि वैवाहिक अधिकारांची पुनर्स्थापना आदी गोष्टी या कायद्यान्वये करता येता त. भारतात अलीकडच्या काळात घटस्फोटांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. त्यामुळे सरकारने घटस्फोटांची प्रकरणे मार्गी लावण्यासाठी कुटुंब न्यायालयांची (फॅमिली कोर्ट) स्थापना केली असून, तेथे अशा प्रकरणांची सुनावणी घेऊन निकाल लावण्यात येतो.

## घटस्फोट

घटस्फोट म्हणजे विवाह–विघटन किंवा वैवाहिक जीवनाचा व संबंधाचा कायदेशीर शेवट. त्यानंतर पती व पत्नी हे एकमेकांस परके होतात, कारण त्यांचे नाते कायद्याने संपुष्टात येते.

न्यायालयीन विभक्ततेसाठी किंवा घटस्फोट हुकूमनाम्यासाठी पीडित पतीला वा पत्नीला प्रतिवादीविरुद्ध खालील नऊ कारणांपैकी कोणत्याही कारणास्तव कलम १३ (१) च्या अनुसार दावा करता येतो :

(१) प्रतिवादीने विवाहानंतर स्वेच्छेने व्यभिचार केला आहे.

(२) प्रतिवादीने वादीस क्रौर्याने (क्रूएल्टी) वागविले आहे.

(३) प्रतिवादीने वादीचा वादीच्या संमतीशिवाय सतत दोन वर्षे त्याग केला आहे.

(४) प्रतिवादी धर्मांतर केल्यामुळे हिंदू राहिलेला/राहिलेली नाही.

(५) प्रतितिवादी बरा न होण्याइतपत वेडा/वेडी आहे किंवा प्रतिवादीचे मानसिक असंतुलन अशा प्रकारचे आहे, की वादीने प्रतिवादीबरोबर राहावे अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. मानसिक असंतुलनामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या मानसिक अस्वास्थ्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

(६) प्रतिवादीस असाध्य स्वरूपाचा कुष्ठरोग झाला आहे.



(७) प्रतिवादीस संसर्गजन्य गुप्तरोग झाला आहे.

(८) प्रतिवादीने संन्यास घेऊन जगाचा त्याग केला आहे.

(९) दाव्यापूर्वी सलग ७ वर्षे प्रतिवादी हयात असल्याचा पुरावा किंवा माहिती ज्यांना त्याचा ठावठिकाणा माहिती असायला पाहिजे, अशा संबंधितांकडे नाही.

**कलम नं. १३ (१ अ) अन्वये पती वा पत्नी खालील कारणांकरिता एकमेकांविरुद्ध दावा लावू शकतात :**

(१) न्यायालयीन विभक्ततेचा हुकूमनामा झाल्यापासून एक वर्षापर्यंत पतिपत्नी वैवाहिक जीवनासाठी एकत्रित राहिलेले नाहीत.

(२) दांपत्याधिकाराचे पुनःस्थापन करण्याचा हुकूमनामा झाल्यापासून एक वर्षापर्यंत पती–पत्नी अशा पुनःस्थापनेसाठी एकत्रित राहिलेले नाहीत.

**कलम नं. १३ (२) अन्वये फक्त पत्नी न्यायालयीन विभक्ततेसाठी किंवा घटस्फोटासाठी खालीलपैकी कोणत्याही कारणास्तव पतिविरुद्ध दावा लावू शकते :**

(१) उपरोक्त अधिनियम अंमलात येण्यापूर्वीच एखाद्या पुरुषाने दोन वा अधिक विवाह केलेले असतील व दोन किंवा अधिक पत्नी एकसमयी हयात असतील, तर त्यांपैकी कोणतीही पत्नी पतीविरुद्ध घटस्फोट मागू शकते.

(२) विवाहानंतर पती जबरी संभोग, समलिंगी संभोग किंवा पशुसंभोग याबद्दल दोषी

ठरला आहे.

(३) पत्नीने पोटगीची हुकूमनामा मिळविल्यानंतर एक वर्षापर्यंत पतिपत्नी विभक्त राहत आहेत.

(४) पत्नीचा विवाह तिचे पंधरा वर्षांचे वय पुरे होण्यापूर्वी झालेला आहे व १८ वर्षांचे वय पुरे होण्याअगोदर तिने त्या विवाहाचा प्रत्यादेश किंवा धिक्कार केलेला आहे, म्हणजे तो विवाह झिडकारला आहे.

वरील एकूण सर्वच कारणापैकी धर्मांतर, संन्यास, सात वर्षे हयात असल्याची माहिती उपलब्ध न होणे, ही तीन कारणे वगळता अन्य कोणत्याही कारणासाठी वादीने घटस्फोटाचा दावा लावलेला असल्यास एकंदर परस्थितीचा साकल्याने विचार करून घटस्फोटाऐवजी न्यायालय फक्त न्यायालयीन विभक्ततेचा हुकूमनामा देऊ शकते. कलम नं. २३ (२) च्या तरतुदीनुसार या अधिनियमान्वये कोणत्याही स्वरूपाचा हुकूमनामा देण्याअगोदर उभयपक्षांमध्ये समझोता व मनोमिलन घडवून आणण्याचा कसोशीने प्रयत्न करणे, हे न्यायालयाचे अपरिहार्य कर्तव्य ठरते. तसेच प्रत्येक वैवाहिक दावा जाहीरपणे आम जनतेसमोर न चालविता बंदिस्त न्यायचौकशी (ट्रायल इन कॅमेरा) पद्धतीने चालविण्यात येतो. काही अपवादात्मक परिस्थिती वगळता विवाहाला एक वर्ष पुरे होईपर्यंत पतीला वा पत्नीला न्यायालयीन विभक्ततेसाठी किंवा घटस्फोटासाठी अर्ज करता येत नाही. वरील तरतुदी पाहता असे दिसते, की भारतातील लोकसंख्येपैकी सुमारे ८० ऋ ८५ टक्के लोकांना लागू होणाऱ्या १९५५ च्या अधिनियमाचा कल प्रामुख्याने विवाहबंधन शिथिल करण्याकडे किंवा तोडण्याकडे नसून ते जतन करण्याकडे आहे. याशिवाय या अधिनियमामधअये पोटगी व निर्वाह, अज्ञान मुलांचा ताबा, उभयतांच्या संयुक्त मालकीच्या मालमत्तेची विभागणी आदी बाबींसंबंधी तरतूद करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिनियमामध्ये १९७६ मध्ये दुरुस्ती होऊन एक अतिशय महत्त्वाची अशी, वधूवरांच्या परस्परसंमतीने घटस्फोट घेण्याची सोय करण्यात आली आहे. कलम नं. (१३ ब) या नवनिर्मित तरतुदीमुळे पती व पत्नी यांना एकमेकाविरुद्ध कोणतेही आरोप न करता संयुक्तपणे न्यायालयाकडे घटस्फोटासाठी अर्ज करता येतो. सदरहू अर्जामध्ये 'आम्ही एकत्र राहू शकत नाही व आमच्या विवाहाचे विघटन व्हावे असे दोघांनीही ठरविले आहे,' असे प्रतिपादन करावे लागते. अर्ज करण्यापूर्वी किमान एक वर्ष पती–पत्नी एकमेकांपासून विभक्त राहत असले पाहिजेत. अर्ज केल्यानंतर सहा महिन्यांच्या आधी नाही व १८ महिन्यांच्या नंतर नाही अशा अवधीमध्ये पती–पत्नींनी आपला अर्ज विचारात घ्यावा, अशी विनंती केल्यावर न्यायालय एकंदर परिस्थितीचा सारासार विचार करून व उभय पक्षांनी केलेल्या प्रतिपादनाची सत्यासत्यता पडताळून घेऊन घटस्फोटाचा हुकूमनामा देऊ शकते.

# प्रसूती लाभ कायदा, १९६१

स्त्री कर्मचाऱ्याला प्रसूतीच्या काळात रजा आणि इतर लाभ मिळण्यासाठी भारतात या कायद्याची तरतूद करण्यात आली आहे. एखाद्या महिलेने एखाद्या आस्थापनेत, संस्थेत, कंपनीत प्रसूतीच्या संभाव्य तारखेच्या अलीकडे १२ महिन्यांत किमान ८० दिवस काम केले असेल, तर ती प्रसूती लाभ कायद्यातील लाभ घेण्यास पात्र ठरते. त्यात प्रसूती रजा, नर्सिंगसाठी लागणाऱ्या सुट्ट्या, वैद्यकीय भत्ता आदी मिळण्यास ती पात्र ठरते.

या कायद्यात काळानुरूप दुरुस्ती करून प्रसूती लाभ (दुरुस्ती) कायदा २०१७ मध्ये संमत करण्यात आला असून, तो एक एप्रिल २०१७ पासून लागू झाला आहे.

## महत्त्वाच्या दुरुस्त्या व बदल

१. पात्र महिला कर्मचाऱ्यास १२ आठवड्यांऐवजी आता २६ आठवडे वेतनासह रजा मंजूर होऊ शकते. यात आठ आठवडे प्रसूतीपूर्व आणि १८ आठवडे प्रसूतीनंतर रजा मिळू शकते. दोन मुलांनंतर होणाऱ्या अपत्यासाठी ही रजा केवळ १२ आठवडे (सहा आठवडे आधी व सहा आठवडे नंतर) एवढीच आहे.

२. दत्तक मातेलाही मिळू शकते रजा. दत्तक घेतल्याच्या तारखेनंतर १२ आठवड्यांसाठी रजा घेता येते.

३. घरून काम करण्याची सवलत. सव्वीस आठवड्यांची रजा संपल्यानंतर महिला कर्मचारी घरून काम करण्याची सवलतही घेऊ शकते. कंपनी आणि कर्मचारी यांच्यातील परस्पर सामंजस्यावर ही सवलत असेल.

४. पन्नास किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेल्या ठिकाणी पाळणाघर सोय आवश्यक. महिला कर्मचाऱ्यास कामाच्या वेळेत चार वेळा तेथे भेट देण्याची परवानगी असेल.



## बदलत गेलेला कायदा

१९९४ – करार तत्त्वावरील/कंत्राटी महिला प्रसूती रजा मंजूर.

१९९५ – शासकीय महिला कर्मचारी दत्तक मुलाच्या संगोपनासाठी ९० दिवसांची रजा मंजूर

२००९ – राज्य शासकीय महिलांना १८० दिवसांची रजा मंजूर

२०१६ – जन्मापूर्वी अपत्य दगावल्यास (मिसकॅरेज) त्या महिलेला सहा आठवड्यांची रजा.

- मॅटर्निटी कायदा लागू होणाऱ्या प्रत्येक कारखाने/कंपन्या/संस्था यांना हा कायदा लागू.
- प्रसूतीच्या रजेबाबत महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या रुजू होण्याच्या दिवशी याबाबत लेखी अथवा ई– मेलद्वारे माहिती देणे संबंधित कंपनीला बंधनकारक
- सव्वीस आठवड्यांच्या रजेचा पगार संबंधित महिलेला देणे बंधनकारक.
- याशिवाय सव्वीस आठवड्यांची रजा संपल्यावर देखील संबंधित महिलेला अतिरिक्त रजा मागण्याचा अधिकार. परंतु त्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार कंपनी व्यवस्थापनाकडे असेल.
- प्रसूती रजा ही प्रसूतीच्या अपेक्षित तारखेच्या आठ आठवडे आधीपासून घेणे अपेक्षित.

# वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१

हा कायदा प्रथम १९७२ मध्ये भारतात अमलात आला. त्यात १९७५ व २००२ मध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या. बेकायदेशीरपणे होणारे गर्भपात रोखणे आणि सोबत होणारे मातामृत्यू व बालमृत्यू रोखणे हा या कायद्याचा हेतू आहे. कुठल्या परिस्थितीत असा गर्भपात करता येईल, याची मार्गदर्शक तत्त्वे या कायद्यात नमूद केली आहेत. असा गर्भपात करण्यात कोणती महिला पात्र असेल याचीही मार्गदर्शक सूची या कायद्यात देण्यात आली आहे.




## पार्श्वभूमी

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मध्ये लागू करण्यात आला. त्यात सन २००२ मध्ये सुधारणा करण्यात आली. देशामध्ये सुरक्षित व कायदेशीर गर्भपात सेवा पुरविण्यासाठी आराखडा बनविण्यात आला.

## वैद्यकीय गर्भपात कायद्याची ठळक वैशिष्ट्ये

- वैद्यकीय गर्भपात कायद्याकरिता गर्भावस्था मर्यादा
- भारतामध्ये कायदेशीर गर्भपातास २० आठवड्यांपर्यंत मान्यता




## वैद्यकीय गर्भपात कायदा

वैद्यकीय गर्भपात कायदयानुसार डॉक्टरांच्या सल्लयानुसार खालील कारणांमुळे वैद्यकीय गर्भपात (मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी – एमटीपी) करता येतो.

- गर्भवती मातेच्या जीवाला धोका असल्यास किंवा गर्भवती मातेला मानसिक किंवा शारीरिक आरोग्यास गंभीर इजा, दुखापत होत असल्यास.
- नवजात बालकास जन्मानंतर मानसिक किंवा शारीरिक व्यंग असल्यास त्यामुळे बालकास अपंगत्व येणार असेल तर.
- महिलेला/कुमारीकेला बलात्कारामुळे गर्भधारणा झाली असेल, तर गर्भपात करता येतो (महिलेच्या मानसिक आरोग्याला जबर धक्का बसल्याचे गृहीत धरून)
- विवाहित महिलेकडून किंवा तिच्या पतीकडून गर्भनिरोधक साहित्याच्या/औषधाच्या निष्क्रियतेमुळे गर्भधारणा झाल्यास.

वैद्यकीय गर्भपात कायद्यानुसार २० आठवड्यांपर्यंत स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ गर्भपात करू शकतात. इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा, १९५६ यात सांगितल्याप्रमाणे, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची वैद्यकीय पदवी (अर्हता) धारण केलेली असावी. ज्यांचे नाव स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे आणि ज्यांना स्त्रीरोग या विषयात काम करण्याचा अनुभव आहे किंवा प्रशिक्षण पूर्ण केले आहे, असे प्रशिक्षित डॉक्टर गर्भपात करण्यासाठी पात्र समजले जातात.

स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्र या विषयात काम करण्याचा सहा महिन्यांचा अनुभव.

सर्व सुविधा असलेल्या शासकीय दवाखान्यात एक वर्ष काम करण्याचा अनुभव.

एमबीबीएस डॉक्टर १२ आठवड्यांपर्यंत गर्भपात करू शकतात. इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा १९५६ या कायद्यात सांगितल्याप्रमाणे असा नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची वैद्यकीय पदवी (अर्हता) धारण केलेली असावी व ज्यांचे नाव

स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे आणि केंद्र सरकारच्याच्या अटींनुसार यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

(एमटीपी कायद्यानुसार एएनएमएस, स्टाफ नर्स, प्रशिक्षित दाई किंवा इतर अप्रशिक्षित व्यक्तींना गर्भपात करण्यात परवानगी नाही. असे असले तरी ते समुपदेशन, प्रसूतिपूर्व गर्भपाताची काळजी घेणे आणि तदनुसार गर्भपात करण्यास संदर्भ सेवा देण्याचे काम करु शकतात.)

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत शासन मान्यताप्राप्त असलेल्या गर्भपात केंद्रातच गर्भपात करता येतो. गर्भपाताच्या सुविधा असलेल्या शासकीय दवाखान्यामध्ये गर्भपात करता येतो, त्यासाठी वेगळी परवानगी घेण्याची गरज नाही.

किंवा एमटीपी सेंटरच्या जागेसाठी (नर्सिंग होम/खासगी दवाखाना/अशासकीय संस्था) यांना जिल्हास्तरीय समिती / जिल्हा शल्य चिकित्सकांची मान्यता, परवानगी घ्यावी लागते.

## कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षेची तरतूद

वैद्यकीय गर्भपात कायदा करणारी कोणतीही व्यक्ती, ज्याची नोंदणी वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नाही त्यास कमीत कमी दोन वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीस होऊ शकते. गर्भपात करणारी कोणतीही व्यक्ती जिच्या जागेस मान्यता नाही, अशा व्यक्तीला कमीत कमी दोन वर्षे आणि जास्त सात वर्षापर्यंत सक्तमजुरी होऊ शकते.

मान्यता नसलेल्या जागेचा मालक, जेथे गर्भपात केला जातो, अशा व्यक्तीस कमीत कमी दोन वर्षे आणि जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरी होऊ शकते. (महिलेचा जीव वाचविण्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडून गर्भपात केला असेल व जागेची मान्यता नसेल, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडे आवश्यक असलेली गर्भपात करण्याकरिता कायदेशीर पूर्तता केली नसेल तर अशी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरत नाही.)

# कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा, २०१३

भारतात आधुनिक काळात नोकरी, व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या स्थितीत कामाच्या ठिकाणी महिलांवर पुरुषांकडून होणारे लैंगिक अत्याचार, शोषण किंवा विनयभंग असे प्रकारही वाढीला लागले आहेत. त्याला आळा घालण्यासाठी २०१३ मध्ये कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा करण्यात आला. भारतात अजूनही अनेक कंपन्या, संस्था, आस्थापनांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही, असे चित्र आहे. महिलांशी अश्लील संभाषण करणे, खूप शारीरिक लगट करणे, सूचक लैंगिक हावभाव करणे, स्पर्श करणे, सूचक बोलणे, अश्लील छायाचित्र पाठवणे, दाखवणे आदी गोष्टीही या कायद्याद्वारे गुन्हा मानण्यात आल्या आहेत.

या कायद्यातील तरतुदी तपशीलवार पाहू.

**कायद्याचे नाव :**

**कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळाविरुद्ध (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा, २०१३**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध त्यांना संरक्षण देण्यासाठी, अशा छळाचा प्रतिबंध करण्यासाठी आणि लैंगिक छळाविरुद्धच्या किंवा त्याच्याशी संबंधित किंवा त्या अनुषंगाने केल्या जाणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठीचा हा कायदा आहे. महिलांचा लैंगिक छळ हा त्यांना राज्य घटनेच्या कलम १४ व १५ नुसार मिळालेला समानतेचा अधिकार व कलम २१ नुसार मिळालेला सन्मानाने जगण्याचा अधिकार, तसेच त्यांच्या स्वतःच्या मर्जीनुसार काम वा व्यवसाय करण्याचा व त्यासाठी लैंगिक छळापासून मुक्त वातावरण मिळवण्याचा अधिकार या मूलभूत अधिकारांचा भंग आहे. त्याचप्रमाणे लैंगिक छळापासून संरक्षण मिळवण्याच्या आणि सन्मानाने काम करण्याच्या महिलांच्या अधिकाराबाबतच्या; तसेच महिलांबाबत होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावांविरुद्धच्या, आंतरराष्ट्रीय सनदेद्वारा मान्य असलेल्या मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. ही सनद

भारताने मान्य केली आहे. त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध महिलांचे संरक्षण करणारी उपाययोजना आखणे केंद्र सरकारवर बंधनकारक बनते.



## कायद्यातील प्रमुख मुद्दे

१. 'महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा, २०१३' नावाचा हा कायदा संपूर्ण भारतात केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून लागू होईल.

**२. काही व्याख्या :**

बाधित महिला : कामाच्या ठिकाणच्या संपर्कातील कोणत्याही वयाची, त्या ठिकाणी कामास असलेली किंवा नसलेली, किंवा एखाद्या राहत्या घरात वा वास्तूत कामाला असलेली, कोणत्याही प्रकारच्या लैंगिक छळापासून बाधित महिला. सक्षम शासन : केंद्र सरकार, केंद्रशासित प्रदेश यांच्या मालकीचे वा नियंत्रणात असलेले किंवा त्यांचा थेट किंवा अन्य माध्यमातून निधी मिळत असल्यास केंद्र सरकार; राज्य सरकारच्या मालकीचे वा नियंत्रणात असलेले किंवा त्यांच्याकडून निधी मिळत असल्यास राज्य सरकार; असा निधी मिळत नसल्यास ज्या राज्यात हे कामाचे ठिकाण आहे ते राज्य सरकार.

**घर कामगार :** घरकाम करण्यासाठी रोख किंवा वस्तू रूपात मोबदला देऊन थेट किंवा एखाद्या संस्थेमार्फत तात्पुरत्या वा कायमस्वरूपी, अर्धवेळ अथवा पूर्ण वेळासाठी नेमलेली; परंतु त्या घरमालकाच्या कुटुंबाची सदस्य नसलेली महिला. कर्मचारी : एखाद्या कामाच्या ठिकाणी नियमित, तात्पुरती, नैमित्तिक किंवा रोजंदारीने, थेट अथवा ठेकेदारासहित एखाद्या माध्यमामार्फत मुख्य मालकाला माहिती असताना किंवा नसताना, पगारी अथवा बिनपगारी किंवा स्वयंसेवी पद्धतीने, कामाचे नियम स्पष्ट असताना किंवा अस्पष्ट, सहायक कर्मचारी, कंत्राटी कामगार, कच्ची वा शिकाऊ अथवा कोणत्याही अन्य नावाने नियुक्त केली गेलेली महिला.

**मालक अथवा नियोक्ता (एम्प्लॉयर) :** कोणत्याही खाते, संस्था, नियंत्रणातील उद्योग, कार्यालय, शाखा अथवा युनिट यांच्याशी संबधित कोणतेही सक्षम सरकार किंवा स्थानिक प्रशासन, वर उल्लेख न केलेल्या कोणत्याही कामाच्या ठिकाणी व्यवस्थापन, निरीक्षण किंवा नियंत्रण करण्याची जबाबदारी असलेली कोणतीही व्यक्ती, मंडळ अथवा कमिटी जी त्या संस्थेसंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्यास व अंमलात आणण्यास जबाबदार असेल. किंवा ती जबाबदारी त्याला ठेक्याने मिळाली

असेल. राहत्या घराच्या बाबतीत जी व्यक्ती घर कामगाराला कामाला लावत असेल किंवा तिच्या कामाचा लाभ घेत असेल, मग घर कामगार कितीही संख्येत असोत, कितीही वेळासाठी नियुक्त केलेले असोत किंवा त्यांच्या नियुक्तीचे वा कामाचे स्वरूप कोणतेही असो.

लैंगिक छळ : पुढे नमूद केलेली थेट अथवा गर्भितार्थ कृती किंवा वागणूक : शारीरिक संपर्क किंवा त्याबाबत पुढाकार; लैंगिक स्वरूपाची मागणी किंवा विनंती; लैंगिक अर्थाच्या टिप्पणी; अश्लील चित्र किंवा तत्सम गोष्टी दाखवणे; अन्य कोणतीही नको असताना केलेली शारीरिक, तोंडी किंवा शब्दात व्यक्त न केलेली लैंगिक स्वरूपाची कृती.

## कामाचे ठिकाण :

अ) सक्षम सरकार, स्थानिक प्रशासन, सार्वजनिक कंपनी, महामंडळ किंवा सहकारी संस्था संचलित कोणतेही खाते, संस्था, उद्योग, कार्यालय, शाखा किंवा युनिट.

आ) खासगी क्षेत्रातील संस्था किंवा कंपनीने चालविलेली संस्था, उद्योग, सोसायटी, विश्वस्त संस्था, स्वयंसेवी संस्था; व्यापारी, व्यावसायिक, कौशल्य प्रशिक्षण, शिक्षण, मनोरंजन, उद्योग, आरोग्य, वित्त आदी क्षेत्रात निर्माण, पुरवठा, विक्री, वितरण किंवा अन्य सेवा देणारी संस्था.

इ) रुग्णालये किंवा शुश्रुषागृह.

ई) खेळांशी संबंधित संस्था, स्टेडियम, वास्तू, स्पर्धा किंवा ठिकाण निवासी असो वा प्रशिक्षण, खेळ किंवा तत्सम कामासाठी वापरात नसलेले असो.

उ) कर्मचारी कामासंदर्भात भेट देत असलेली ठिकाणे किंवा एम्प्लॉयरने पुरवलेली वाहतुकीची साधने.

ऊ) एम्प्लॉयरचे निवासाचे ठिकाण अथवा घर.

**असंघटित क्षेत्र :** असे कामाचे ठिकाण, ज्याची मालकी वस्तूंचे उत्पादन वा विक्री करणाऱ्या



किंवा कोणत्याही प्रकारच्या सेवा पुरवणाऱ्या व्यक्ती किंवा स्वयंरोजगार करणाऱ्या कामगारांकडे असेल आणि ज्या ठिकाणी कामगार लावले गेलेले असतील, त्यांची संख्या दहापेक्षा जास्त नसेल.

## लैंगिक छळाला प्रतिबंध :

अ) कोणत्याही महिलेचा लैंगिक छळ होता कामा नये.

आ) पुढील परिस्थितीत लैंगिक स्वरूपाचे वर्तन केले गेल्यास तो लैंगिक छळ समजला जावा.

महिलेला कामाबाबत खास प्राधान्य देण्याचे गर्भित वा स्पष्ट वचन देऊन; तिच्या कामाबाबत नुकसान करण्याची धमकी देऊन; तिच्या कामाच्या सध्याच्या किंवा भविष्यातील पदाबाबत धमकी देऊन; तिच्या कामात हस्तक्षेप करून किंवा तिच्यासाठी असुरक्षित, विरोधी व आक्रमक असे कामाचे वातावरण निर्माण करून; तिला अपमानास्पद वागणूक देऊन; तिचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आणून.

अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना : प्रत्येक मालक वा एम्प्लॉयरने लिखित आदेशानुसार 'अंतर्गत तक्रार कमिटी'चे गठन करावे. अनेक ठिकाणी कामकाज असलेल्या एम्प्लॉयरने आपल्या प्रत्येक विभागामध्ये आणि प्रशासकीय शाखा किंवा कार्यालयांमध्ये त्या स्तरावरील अंतर्गत कमिटी बनविली पाहिजे.

## अंतर्गत कमिटीचे सदस्य :

अ) अध्यक्षपदी त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांधून वरिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. त्या ठिकाणी अशी वरिष्ठ महिला उपलब्ध नसल्यास त्याच मालकाच्या अन्य शाखांमधील वरिष्ठ महिलेला अध्यक्षपद देण्यात यावे.



आ) कर्मचाऱ्यांमधून कमीत कमी दोन सदस्य असे नेमण्यात यावेत ज्यांची महिलांच्या प्रश्नांवर बांधिलकी असेल व ज्यांना समाजकार्याचा अनुभव असेल किंवा कायद्याची माहिती असेल.

इ) स्वयंसेवी संस्था किंवा संघटनांमधून एक सदस्य असा घेण्यात यावा, ज्यांची महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असेल; तसेच लैंगिक छळाच्या सर्व मुद्द्यांबाबत



जाण असेल. कमिटीमधील किमान ५० टक्के सदस्य महिला असल्या पाहिजेत; अध्यक्ष व कमिटीचे अन्य सदस्य त्यांची नेमणूक झाल्यापासून जास्तीत जास्त तीन वर्षे त्या कमिटीवर काम करतील; स्वयंसेवी संस्थेमधून घेण्यात आलेल्या सदस्याला सुचविण्यात आलेली फी किंवा भत्ता एम्प्लॉयर देईल; अध्यक्ष किंवा एखाद्या सदस्यावर एखादी गुन्हेगारी स्वरूपाची किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरू असल्यास त्या सदस्याला कामिटीवरून काढण्यात येईल व रिक्त जागा नियमाप्रमाणे भरण्यात येईल.

स्थानिक तक्रार कमिटीची स्थापना : सक्षम जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांपैकी एकाची नेमणूक या कायद्यातील कामकाजाची पूर्तता करण्यासाठी जिल्हा अधिकारी म्हणून करतील.

प्रत्येक जिल्हा अधिकारी आपल्या जिल्ह्यासाठीच्या 'स्थानिक तक्रार कमिटी'ची स्थापना करतील. दहापेक्षा कमी कामगार असल्यामुळे अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना होऊ न शकलेल्या सर्व कामाच्या ठिकाणांमधील लैंगिक छळाच्या तक्रारींची नोंद ही स्थानिक तक्रार कमिटी करून घेईल आणि त्यांची सुनावणी घेतील. जिल्हा अधिकारी ग्रामीण व आदिवासी भागात प्रत्येक तालुक्यासाठी एक व शहरी भागात प्रभाग किंवा महापालिका स्तरावर एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करतील, जे त्यांच्याकडे दाखल झालेल्या तक्रारी सात दिवसांच्या आत स्थानिक तक्रार कमिटीकडे पाठवतील. स्थानिक तक्रार कमिटीचे अधिकारक्षेत्र संबंधित जिल्हा असेल.

**स्थानिक तक्रार कमिटीचे स्वरूप, कार्यकाल आणि नियम :** समाजकार्याच्या क्षेत्रामधील व महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या प्रथितयश महिला कार्यकर्त्यांमधून अध्यक्षांची नेमणूक करण्यात यावी; एक सदस्य तालुका, महानगरपालिका इत्यादीत काम करणाऱ्या महिलांमधून घ्यावा; दोन सदस्य ज्यातील किमान एक महिला असेल, महिला प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या स्वयंसेवी संस्थेमधून किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नाची जाण असलेल्यांमधून घेण्यात यावेत.



त्यातील एका सदस्याची पार्श्वभूमी कायदे क्षेत्रातील असावी किंवा त्याला कायद्यांची चांगली जाण असावी. किमान एक सदस्य अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास जाती, अल्पसंख्यक समाजातील महिला असावी; जिल्हा समाज कल्याण किंवा महिला बाल विकास अधिकारी या कमिटीचे पदसिद्ध सदस्य असतील; स्थानिक तक्रार कमिटीचे अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ नेमणूक केल्यापासून तीन वर्षांपेक्षा जास्त असणार नाही; बाकी सर्व नियम अंतर्गत कमिटी प्रमाणेच असतील.

केंद्र सरकार फी व भत्ते देण्यासाठी राज्य सरकारकडे लोकसभेने मंजूर केलेला निधी वर्ग करील आणि तो निधी आवश्यकतेनुसार जिल्हा प्रशासानांकडे वर्ग करण्यात येईल.

**तक्रार :** बाधित महिलेने अंतर्गत तक्रार कमिटी व ज्या ठिकाणी अशी कमिटी नसेल तिथे स्थानिक तक्रार कमिटीकडे घटना घडल्याच्या तीन महिन्यांच्या आत किंवा वारंवार लैंगिक छळाच्या घटना घडत असतील तर शेवटची घटना घडल्याच्या तीन महिन्यांच्या आत लेखी तक्रार करू शकेल. तिला लेखी तक्रार देणे शक्य नसल्यास कमिटीचे अधिकारी, अध्यक्ष यांनी तशी व्यवस्था करावी. बाधित महिलेची शारीरिक किंवा मानसिक अक्षमता किंवा तिचा मृत्यू झालेला असल्यास तिचा कायदेशीर वारस किंवा अन्य नेमलेली व्यक्ती तिच्या वतीने तक्रार दाखल करू शकेल.

तडजोड : बाधित महिलेच्या विनंतीवरून तक्रारदार व जाब देणार यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याची कार्यवाही अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार कमिटी आर्थिक तडजोड न करण्याच्या अटीवर करू शकेल. घडून आलेल्या तडजोडीबाबत अंतर्गत कमिटी नियोक्त्यांना किंवा स्थानिक कमिटी जिल्हा अधिकारी यांना लेखी माहिती देतील. तसेच तडजोडीच्या प्रती बाधित महिला व जाब देणार यांना देण्यात येतील. तडजोड घडून आल्यानंतर पुढील चौकशीची कारवाई थांबविण्यात येईल.

**तक्रारींची चौकशी :** जाब देणारी व्यक्ती कर्मचारी असल्यास व त्यांना कामाचे नियम लागू असल्यास त्या नियमांप्रमाणे पुढील चौकशी सुरू होईल; तसेच ज्यांना असे नियम लागू नाहीत त्यांच्याबाबत विशेषतः तक्रारदार घरकामगार असल्यास भारतीय दंड संहिता कलम ५०९ अथवा अन्य योग्य कलमानुसार तक्रार नोंदविल्यापासून सात दिवसांच्या आत पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदला जाईल. मात्र, त्यासाठी या तक्रारीबाबत कोणतीही तडजोड झालेली नसल्याचा निर्वाळा तक्रारदाराने दिलेला असला पाहिजे. दोन्ही पक्ष कर्मचारी असल्यास दोघांनाही एकमेकांनी दिलेल्या जबाबांची प्रत देण्यात येईल, जेणेकरून त्यांना त्यांची उत्तरे देता येतील. अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार कमिटीला दिवाणी कोर्टाप्रमाणे पुढील अधिकार असतील : कोणत्याही व्यक्तीला समजपत्र पाठवून बोलावून घेणे व त्यांना कमिटीसमोर उपस्थित राहण्यास व शपथेवर जबाब द्यायला बाध्य करणे; आवश्यक ती कागदपत्रे शोधणे किंवा बनविणे; आवश्यक ती अन्य कोणतीही कार्यवाही करणे.

चौकशी चालू असताना करावयाची कृती : लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी चालू असताना बाधित महिलेच्या विनंतीवरून संबंधित कमिटी एम्प्लॉयरकडे खालील शिफारस करू शकेल : तक्रारदार महिलेची किंवा जाब देणाऱ्याची अन्य कामाच्या ठिकाणी बदली करावी. किंवा बाधित महिलेला तीन महिन्यांपर्यंतची रजा मंजूर करण्यात यावी. ही रजा तिच्या अन्यथा मिळणाऱ्या रजेच्या व्यतिरिक्त असावी; आवश्यकतेनुसार अन्य कोणताही दिलासा द्यावा. एम्प्लॉयर वरील शिफारशींनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित कमिटीला देईल.

## चौकशीचा अहवाल :

१. या कायद्यानुसार केल्या जाणारी चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यामधून निघालेल्या निष्कर्षांचा अहवाल संबंधित तक्रार कमिटी एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकारी यांना चौकशी पूर्ण झाल्याच्या दहा दिवसाच्या आत देईल. त्याची प्रत संबंधित पक्षांना उपलब्ध करून देण्यात येईल.

२. अंतर्गत तक्रार कमिटी अथवा स्थानिक तक्रार कमिटीच्या चौकशीत जाब देणाऱ्या विरुद्धचा आरोप सिद्ध न झाल्यास कमिटी एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना जाब देणाऱ्याविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याची शिफारस करेल.

३. संबंधित तक्रार कमिटीच्या चौकशीत जाब देणाऱ्याविरुद्धचा आरोप सिद्ध झाल्यास कमिटी एम्प्लॉयर अथवा जिल्हा अधिकाऱ्यांकडे पुढील शिफारसी करू शकतात : अ) जाब देणाऱ्याला लागू असलेल्या कामाच्या नियमावलींमधील लैंगिक गैरवर्तणुकीविरुद्ध केल्या जाणाऱ्या शिक्षा त्याला देण्यात याव्यात, आ) बाधित महिलेला किंवा तिच्या



वारसाला नुकसान भरपाई म्हणून देण्यात येणारी रक्कम जाब देणाऱ्याच्या पगारातून कपात करण्यात यावी. इ) त्याला नोकरीतून काढणे अथवा गैहजरीमुळे पगारातून कपात शक्य नसल्यास त्याने ती रक्कम थेट भरावी, असा हुकूम देण्यात यावा. त्याने ती रक्कम न भरल्यास थकबाकी कायदेशीर कारवाई करून वसूल करण्यात यावी. ई) एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकारी त्यांना शिफारशी प्राप्त झाल्याच्या ६० दिवसांच्या आत त्यांची अंमलबजावणी करील.

## खोट्या किंवा खोडसाळपणे केलेल्या तक्रारी व बनावट पुरावे दिल्याबद्दल शिक्षा

१. संबधित कमिटीला बाधित महिलेने किंवा अन्य व्यक्तीने जाब देणाऱ्याविरुद्ध केलेली तक्रार खोटी आढळून आल्यास अथवा त्यांनी पुरावा म्हणून दिलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळून आल्यास त्या तक्रारदार महिलेविरुद्ध किंवा अन्य तक्रारदाराविरुद्ध कामाच्या नियमावलीनुसार अथवा कमिटीच्या शिफारसीनुसार कारवाई करता येईल. परंतु केवळ आरोप सिद्ध करणे अथवा पुरावे देण्यास अक्षम असणे या गोष्टी शिक्षा देण्यासाठी पुरेशा ठरणार नाहीत. त्याही पुढे जाऊन तिच्यावर कारवाई करण्याआधी तक्रारदार महिलेचा खोडसाळ हेतू तिच्याविरुद्धच्या चौकशीत निर्विवादपणे सिद्ध करावा लागेल.

२. चौकशीच्या दरम्यान एखाद्या साक्षीदाराने खोटी साक्ष अथवा चुकीची माहिती दिल्याचे संबंधित तक्रार कमिटीला आढळून आल्यास त्याला लागू असलेल्या कामाच्या नियमावलीनुसार किंवा कमिटीच्या शिफारसीनुसार त्याच्याविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस कमिटी एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकाऱ्याकडे करता येईल.

**नुकसानभरपाईची रक्कम निश्चित करणे :** बाधित महिलेला देण्याच्या नुकसानभरपाईची रक्कम ठरवताना पुढील गोष्टी विचारात घ्याव्यात : बाधित महिलेला सहन करावा लागलेला मानसिक शारीरिक त्रास, भावनिक दुःख; लैंगिक छळामुळे सहन करावे लागलेले व्यावसायिक संधीचे नुकसान; बाधित महिलेचा शारीरिक मानसिक उपचारांवर झालेला खर्च; जाब देणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न व आर्थिक स्तर; रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्याने देण्याची क्षमता.

**बाधित महिला, तिची तक्रार व त्याबाबतच्या चौकशीची प्रक्रिया या सर्व गोष्टींबाबत गुप्तता :** माहितीच्या अधिकाराचा अपवाद वगळता अन्यथा कोणालाही बाधित महिला, तिची तक्रार व चौकशी याबाबत माहिती देता येणार नाही. त्यांना प्रसिद्धी देता येणार नाही. तक्रारदार महिला व साक्षीदार यांचे नाव, पत्ता, ओळख किंवा त्या दिशेने जाण्यास मदत करणारी माहिती गुप्त ठेवावी लागेल.

वरील माहिती गुप्त ठेवण्याच्या कलमाचा भंग करून तिला प्रसिद्धी दिल्यास अशा व्यक्तीविरुद्ध त्या व्यक्तीला लागू असलेल्या कामाच्या नियमावलीनुसार अथवा कमिटीने सुचविल्यानुसार कारवाई करता येईल.

**अपील :** कमिटीच्या शिफारशी वा अंमलबजावणी याबाबत कामाच्या नियमावलीनुसारचे कोर्ट अथवा लवादाकडे (ट्रायब्युनल) व अशी नियमावली लागू नसल्यास सक्षम त्या कोर्टात

शिफारशी पाठवल्याच्या ९० दिवसांच्या आत अपील करता येईल.

**मालक अथवा एम्प्लॉयरचे कर्तव्य :** प्रत्येक एम्प्लॉयरने, अ) कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे. यात कामाच्या ठिकाणी संपर्कात येणाऱ्या व्यक्तींपासूनची सुरक्षा समाविष्ट आहे. आ) लैंगिक छळाविरुद्ध होणाऱ्या कारवाईबाबत, तसेच अंतर्गत तक्रार कामितीबाबत सर्वांना दिसेल अशा ठिकाणी माहिती प्रदर्शित करावी. इ) या कायद्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, जनजागृतीचे कार्यक्रम नियमितपणे घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांना कायदा, त्यातील तरतुदी, अंतर्गत तक्रार कमिटी व त्याचे सदस्य यांची माहिती द्यावी. ई) अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार कमिटीला कामकाज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्यावीत. उ) अंतर्गत किंवा स्थानिक कामिटीसमोर जाब देणाऱ्या व्यक्तीला व साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी कमिटीला सहकार्य करावे. ऊ) तक्रारीच्या चौकशीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे व माहिती कमिटीला उपलब्ध करून द्यावी. ए) बाधित महिला भारतीय दंड संहिता किंवा त्या वेळी लागू असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याची मदत घेऊ इच्छित असल्यास तिला सर्व साह्य द्यावे, ऐ) लैंगिक छळ करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहिता किंवा त्या वेळी लागू असलेल्या कायद्याच्या अंतर्गत कारवाई सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. ती व्यक्ती कर्मचारी असल्यास त्याची लैंगिक छळाची कृती ही गैरवर्तणूक आहे, असे मानून त्याच्या विरुद्ध कामाच्या नियमावलीत गैरवर्तणुकीबाबत असलेली कारवाई सुरू करावी. ती व्यक्ती कर्मचारी नसल्यास अन्य कायद्यांच्या आधारे कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अंतर्गत कमिटी वेळेत कारवाई करीत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवावे.

**जिल्हा अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये :** जिल्हा अधिकारी स्थानिक कमिटी वेळेत अहवाल सादर करीत आहे काय यावर लक्ष ठेवतील; तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने लोकांमध्ये लैंगिक छळाबाबतचा कायदा व महिलांचे अधिकार याबाबत जागृती घडवून आणतील.

**कमिटीने द्यावयाचा वार्षिक अहवाल :** अंतर्गत कमिटी व स्थानिक कमिटी दर वर्षी आपल्या कामकाजाचा अहवाल तयार करील आणि अनुक्रमे एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना देईल. या अहवालांच्या आधारे जिल्हा अधिकारी एक संक्षिप्त अहवाल राज्य सरकारला देतील.

**एम्प्लॉयरने कंपनीच्या वार्षिक अहवालात द्यावयाची माहिती :** एम्प्लॉयर आपल्या कंपनीच्या वार्षिक अहवालात कंपनीत नोंद झालेल्या तक्रारी, आणि त्यावरील कार्यवाही याबाबतच्या अहवालाचा समावेश करील. असा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला जात नसेल, तर हा अहवाल जिल्हा अधिकाऱ्याला सादर करील.

**सक्षम शासनाचे कर्तव्य :** सक्षम शासन कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवील आणि नोंदलेल्या तक्रारी व त्यांच्यावरील कार्यवाहीची माहिती व आकडेवारी गोळा करील.

**सरकारने द्यावयाची प्रसिद्धी :** सक्षम शासन उपलब्ध निधी व साधनांच्या मर्यादेत आवश्यक ती माहिती, शिक्षण, संपर्क आणि प्रशिक्षणाची साधने विकसित करील; तसेच महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून सुरक्षा देण्यासाठीच्या या कायद्यातील तरतुदींबाबत जनजागृतीचे व लोकांची त्याबाबत समज वाढविण्यासाठीचे कार्यक्रम करील. तसेच स्थानिक तक्रार कमिटीच्या सदस्यांची समज तयार करणे व त्यांची प्रशिक्षण करणे यासाठीचे कार्यक्रम करील.

## माहिती मागवण्याचा व रेकॉर्ड तपासण्याचा अधिकार

१. सक्षम शासन जनहित व महिला कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणचे हित लक्षात घेऊन लिखित आदेशांद्वारे : आवश्यकता भासल्यास कोणत्याही एम्प्लॉयर अथवा जिल्हा अधिकाऱ्यांना बोलावून लैंगिक छळाबाबतची माहिती मागवून घेईल; तसेच लैंगिक छळाच्या संदर्भात एखादे रेकॉर्ड किंवा कामाचे ठिकाण तपासण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करील, जो ठराविक कालावधीत आपला तपासणीबाबतचा अहवाल सादर करील.

२. प्रत्येक नियोक्ता किंवा जिल्हा अधिकारी व तपासणी अधिकाऱ्याच्या मागणीनुसार संबंधित विषयाची माहिती, रेकॉर्ड व त्यांच्या ताब्यातील अन्य कागदपत्रे त्याच्यासमोर सादर करतील.

**कायद्यातील तरतुदींचे पालन न केल्याबद्दल दंड :** १. एम्प्लॉयरने अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना; तक्रारींबाबत कार्यवाही; हा कायदा व त्याचे नियम यांचे पालन न केल्यास एम्प्लॉयरला ५० हजार रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. २. एखाद्या एम्प्लॉयरला वरील कोणत्याही कारणाने दंड झालेला असेल व त्याने पुन्हा त्याचे उल्लंघन केल्यास त्याला, पहिल्या वेळी झालेल्या दंडाच्या दुप्पट दंड होईल किंवा त्याचा व्यवसाय करण्याचा परवाना रद्द केला जाऊ शकतो.

**कोर्टाची दखल :** या कायद्याच्या तरतुदींमध्ये कोणतेही कोर्ट दखल घेणार नाही; मेट्रोपॉलिटन किंवा ज्युडिशियल कोर्टाच्या खालील कोर्ट या कायद्याच्या अंतर्गत कारवाई करणार नाही; या कायद्यातील प्रत्येक गुन्हा अदखलपात्र असेल.

या कायद्यातील तरतुदी अन्य कायद्यांचा भंग करणार नाहीत; पण त्यांना पूरक असू शकतील.

**सक्षम सरकारचा नियम बनविण्याचा अधिकार :** केंद्र सरकार या कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यासाठी खालील मुद्द्यांवर आवश्यक नियम बनवू शकेल : सदस्यांना देण्याची फी व भत्ते; सदस्यांची नेमणूक; अध्यक्ष व सदस्यांना देण्याची फी व भत्ते; तक्रार करू शकणारी व्यक्ती; चौकशीची पद्धत; चौकशी करण्याचा अधिकार; दिलासा देण्यासंबंधीची शिफारस; कायद्यातील विविध कलमान्वये करावयाच्या कारवाईची पद्धत; कार्यशाळा, कर्मचाऱ्यांसाठी जनजागृतीचे, सदस्यांसाठी समज वाढविण्याचे कार्यक्रम आयोजित करण्याची पद्धत आणि कामिट्यांनी वार्षिक अहवाल देण्याची पद्धत.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार :** या कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यात कोणतीही अडचण किंवा अवरोध निर्माण झाल्यास त्यावर मात करण्यासाठी दोन वर्षांच्या आत त्या तरतुदींना पूरक आदेश काढेल व ते लोकसभेसमोर मांडेल.

## महिलांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंधक) कायदा, १९८६

या कायद्यान्वये महिलांचे असभ्य प्रदर्शन – जाहिरात, प्रकाशने, लिखाण, चित्रे, शिल्प किंवा अन्य कुठल्याही माध्यमातून – करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा २३ डिसेंबर १९८६ रोजी अस्तित्वात आला. जम्मू–काश्मीर राज्य वगळता, तो संपूर्ण भारतात लागू आहे.

या कायद्याअंतर्गत दोषी आढळल्यास दोन हजार रुपये दंड आणि/किंवा दोन वर्षांपर्यंत कारावास अशी शिक्षा होऊ शकते.

## राष्ट्रीय महिला आयोग, १९९०

महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या, त्यांना वैधानिक आधार देण्याच्या हेतूने 'राष्ट्रीय महिला आयोग, १९९०' हा कायदा भारतात करण्यात आला. ही केंद्र सरकारची संवैधानिक संस्था आहे. या कायद्यान्वये राष्ट्रीय महिला आयोग या संस्थेची स्थापना जानेवारी १९९२ मध्ये करण्यात आली. भारतीय महिलांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्याचे काम ही संस्था करते. महिलाविषयक प्रश्नांवर आवाज उठविण्याचे काम या संस्थेमार्फत सुरू असते. महिलांचा सामाजिक दर्जा उंचावणे, त्यांना आर्थिक स्थैर्य व स्वातंत्र्य प्राप्त करून देणे हा या संस्थेचा उद्देश आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या बरोबरीने सर्वच राज्यांमध्ये राज्य महिला आयोगांचीही स्थापना करण्यात आली आहे. संबंधित राज्यांच्या कार्यक्षेत्रात, तळागाळापर्यंत जाऊन महिलांसाठी काम करणे हे राज्य आयोगांचे उद्दिष्ट आहे.

## समान मोबदला कायदा, १९७६

पूर्वी पुरुषांच्या तुलनेत महिलांना कामाचा कमी मोबदला दिला जात असे. मात्र, केंद्र सरकारने १९७६ मध्ये केलेल्या 'समान मोबदला कायद्या'न्वये स्त्री व पुरुषांना एखाद्या समान कामाचा समान मोबदला किंवा मेहनताना दिला जाणे कायद्याने बंधनकारक आहे. त्यात भेदभाव करता येणार नाही. आजही अनेक ठिकाणी स्त्रियांना कमी वेतनावर काम करावे लागते. स्त्री आणि पुरुष यांना वेतन देताना भेदभाव केला जातो. मात्र, या कायद्यान्वये महिलांनाही पुरुषांसारखेच काम त्या करत असतील, तर त्यांच्याएवढाच मेहनताना मिळणारा अधिकार आहे.

# महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची ‘सुहिता’ हेल्पलाइन**
०२२–७४७७७२२४२४

**महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे**
०२०–२६०५०१९१ (www.punepolice.gov.in )

**पुणे नियंत्रण कक्ष**
०२०–२६१२६२९६

**पुणे महिला साह्य कक्ष**
०२०–२६२०८३४१

**पुणे सखी हेल्पलाइन**
०२०–२४४८४५३५

**आय लव्ह मुंबई आणि सकाळ**
८८८८८०९३०६

**पुणे गुन्हे शाखा कक्ष**
०२०–२६११२२२२, २६२०८२९५

**हेल्पलाइन**
१८१

**स्त्री सन्मान हेल्पलाइन**
०२२–८८८८८०९३०६

**नवी दिल्ली हेल्पलाइन**
१८२

# आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९–ब, ४२–ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार म हिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंम लबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

## आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलाविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलाविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई
समान हक्क
• MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN •

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
**दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८**
**‘सुहिता’ हेल्पलाइन – ७४७७७२२४२४**

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com